## प्रस्तावना

प्रति,
मा. प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

विषय :- महानगरपालिकेच्या स्व. मिनाताई ठाकरे रंगायतन नुतनिकरण कामी सुधारित अंदाजपत्रकास मान्यता मिळणे बाबत.

संदर्भ :- १) सह सचिव, नगर विकास विभाग यांचे क्रमांक मनपा-२०२०/प्र.क्र.०३/ नवि-१६ दि. १८ जानेवारी २०२० रोजीचे पत्र
२) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.-मनपा-२०२०/प्र.क्र.३/न.वि.-१६ दिनांक २१ मार्च २०२२
३) मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील क्र./सामान्य/नवि/टे-४/भिवंडी मनपा /प्र.मा./एसआर-७०/२०२२ दि.०७/०४/२०२२
४) नगर विकास विभाग, मंत्रालय यांचेकडील क्रमांक : भनिम२०२२/ व्हिआयपी. क्र. १४/नवि-२३ दि. ०८ सप्टेंबर, २०२२ रोजीचे पत्र
५) इकडील जा.क्र./भिनिशमनपा/बांध./३८६४ दि. १०/१०/२०२२ रोजीचे मा. अवर सचिव सो. यांना दिलेले पत्र
६) इकडील जा.क्र./भिनिशमनपा/बांध./४१२० दि. ०३/११/२०२२ रोजीचे मा. प्रधान सचिव सो. यांना दिलेले पत्र

मे. सादर,

स्व. मिनाताई ठाकरे नाट्यगृह इमारतीचे दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता असल्याने व मनपाची आर्थिक स्थिती बेताची असल्याने संदर्भ क्र. ०१ अन्वये शासनाकडील पत्रानुसार रु.      खर्चाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यांत आला होता. वरिल संदर्भिय क्र. ०२ च्या शासन निर्णयानुसार रक्कम रु. १० कोटी निधी मंजुर केला आहे.

त्यानुसार स्व. मिनाताई ठाकरे नाट्यगृहाचे बांधकाम करणे. (रक्कम रु.१०,५७,७४,६००/-) इतक्या रक्कमेची ई निविदा दि. १२/०४/२०२२ ते ०६/०५/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यांत आलेली होती. सदरकामी एकुण ०६ निविदा प्राप्त झाल्या असुन, निविदेचा तांत्रीक देकार दि. १२/०५/२०२२ रोजी उघडण्यांत आलेला आहे. पैकी पात्र ०४ निविदाकारांचा आर्थिक देकार दि. २८/०६/२०२२ रोजी उघडण्यांत आला आहे. प्राप्त निविदाधारकांपैकी **मे. आर. अँड के. इन्फ्रा, नाशिक.** यांची सर्वात कमी दराची ई निविदा म्हणजेच १२ टक्के कमी दराने रक्कम रु. ९,३०,८१,६४८/- इतक्या रक्कमेची प्राप्त झाली आहे. शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि. २७/०९/२०१८ अन्वये अतिरिक्त अनामत रक्कम रु. २७,९२,४४९/- इतक्या रक्कमेची बँक प्रतिपुर्ती सादर करणेस जा. क्र/बांध./२८६४ दि. २५/०७/२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यांत आलेले आहे. परंतु सदर संस्थेने विहीत वेळेत बँकेची प्रतिपुर्ती सादर केलेली नाही. प्रस्तावित काम हे शासन निधी अंतर्गत असुन, काम विहीत मुदतीत पुर्ण करणे क्रमप्राप्त आहे. L-1 निविदाकार यांनी सदर कामाबाबत उदासिनता

दाखविलेली आहे. सबब पुढीलकामी **मे. आर. अँड के. इन्फ्रा, नाशिक.** यांची L-1 निविदा रद्द करुन याकामी प्राप्त इतर L-2, L-3 व L-4 या निविदाधारकांस L-1 यांच्या दराने काम करण्यासंबंधी त्यांचे निविदा दर कमी करणेकरिता बैठक बोलाविण्यांत आली होती. परंतु प्रसिद्ध केलेल्या निविदेचे दर हे राज्य दर सुची सन २०२०-२१ चे असल्याने व सद्या आर्थिक वर्ष सन २०२२-२३ चालु असल्याने सदर दरांत साधारणतः 22% ची तफावत आहे. याकारणे इतर तिनही निविदाकार सदरचे काम कमी दरांत करणेस इच्छुक नाहीत.

मे. आर. अँड के. इन्फ्रा, नाशिक यांची याकामी मनपाकडे जमा असलेली इसारा रक्कम जप्त केली आहे. विषयांकीत कामी राज्य दर सुचि २०२२-२३ नुसार नविन अंदाजपत्रकीय रक्कमेस फेर शासन मान्यता घेणे कामी मा. आयुक्त सो. यांनी दि. २६/०९/२०२२ रोजी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार तांत्रीक सल्लागार यांना राज्य दर सुचि २०२२-२३ नुसार नविन अंदाजपत्रक तयार करणे कामी कळविले असता, त्यांनी राज्य दर सुची सन २०२२-२३ नुसार रक्कम रु. १५,५०,४३,१००/- चे अंदाजपत्रक तयार करुन मनपास सादर केले आहे.

संदर्भ क्र. ०५ च्या पत्रान्वये मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांनी सदर कामाची पुनर्निविदा बाबत अहवाल सादर करणेकामी निर्देश दिले आहेत. मे. अजय ठाकुर अँड असो. यांचे मार्फत सदर कामाचे सविस्तर सुधारीत आराखडे व अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन त्याची अंदाजपत्रकीय रक्कम रु. १५,५०,४३,१००/- इतकी होत असुन, त्याचा विस्तृत आराखडा खालिल प्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाब | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | स्थापत्य काम | रु. ३,५९,८२,७१४/- |
| २ | विद्युतीकरण | रु. २,१२,६७,८३३/- |
| ३ | फायर फायटींग यंत्रणा | रु. ७१,६३,२६२/- |
| ४ | वातानुकुलीत यंत्रणा | रु. १,८०,०९,२४२/- |
| ५ | सि.सि.टी.व्ही. | रु. १०,८४,८९७/- |
| ६ | एकॉस्टीक काम | रु. १,६५,३५,९९३/- |
| ७ | ध्वनीक्षेपण यंत्रणा | रु. १,३२,८१,१५६/- |
| ८ | स्टेज लायटींग | रु. १,०१,२३,१४२/- |
| | **एकुण** | **रु. १२,३४,४८,२३९/-** |
| | आर्किटेक्ट फी २% | रु. २४,६८,९६५/- |
| | लेबर इन्स्युरंस ०.५०% | रु. ६,१७,२४१/- |
| | कंटेनजन्सी ४% | रु. ६१,७२,४१२/- |
| | जी.एस.टी. १८% | रु. २,२२,२०,६८३/- |
| | रॉयल्टी | रु. १,१५,५९२/- |
| | **एकुण रक्कम रु.** | **१५,५०,४३,१००/-** |
| (अक्षरी रक्कम रु. पंधरा कोटी पन्नास लाख त्रेचाळीस हजार शंभर रुपये मात्र) | | |

सद्या मनपाची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने, कृपया वरिल कामी रक्कम रु. १५,५०,४३,१००/- च्या प्रस्तावास शासन हिस्सा १०० टक्केची शासन मान्यता कामी वरिल संदर्भिय क्र. नुसार प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. सुधारीत अंदाजपत्रकानुसार वाढीव निधी मंजुर न झाल्यास मंजुर निधी रु. १० कोटी पेक्षा जादा येणारा महानगरपालिकेच्या निधीतून करावा लागणार आहे. त्याकरीता मनपा सुधारीत अर्थसंकल्प सन २०२२-२३ व सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पमध्ये तरतुद करावी लागेल. स्व. मिनाताई ठाकरे रंगायतन गेल्या चार वर्षांपासुन बंद अवस्थेत असुन, शासन निधी मंजुर होऊन काम होत नसल्याने शहरातील नागरीकांच्या, सामाजीक संस्थांच्या इ. अनेक प्रकारच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. तसेच वर्तमान पत्रात देखील वारंवार याबाबत बातम्या प्रसिद्ध होत आहेत. तसेच संदर्भ क्र. ०४ नुसार पुनर्निविदा मागविणे बाबत शासनाकडून पत्र प्राप्त झालेले आहे.

महानगरपालिकेत सद्यस्थितीत महासभा व स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ (१) नुसार मा. प्रशासक म्हणून अधिकार असल्याने सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व तद्नंतर सदर कामी निविदा मागविणे बाबत प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे. तरी सदर प्रस्तावास मान्यता मिळावी. सविनय सादर.

(सुनिल डी. घुगे)
शहर अभियंता
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दिनांक :-२४ / ११ /२०२२

ठराव क्र. :- ५६

**विषय :- महानगरपालिकेच्या स्व. मिनाताई ठाकरे रंगायतन नुतनिकरण कामी सुधारित अंदाजपत्रकास मान्यता मिळणे बाबत.**

महानगरपालिकेच्या स्व. मिनाताई ठाकरे रंगायतन नुतनिकरण कामी सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु. १५,५०,४३,१००/- मात्रच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यांत आलेला असुन, मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांनी सदर कामाची पुनर्निविदा बाबत अहवाल सादर करणेकामी निर्देश दिले आहेत. मे. अजय ठाकुर अँड असो. यांचे मार्फत सदर कामाचे सविस्तर सुधारीत आराखडे व अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन त्याची अंदाजपत्रकीय रक्कम रु. १५,५०,४३,१००/- इतकी होत आहे.

| अ.क्र. | बाब | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| | | रु. ३,५९,८२,७१४/- |
| १ | स्थापत्य काम | रु. २,१२,६७,८३३/- |
| २ | विद्युतीकरण | रु. ७१,६३,२६२/- |
| ३ | फायर फायटींग यंत्रणा | रु. १,८०,०९,२४२/- |
| ४ | वातानुकुलीत यंत्रणा | |

| | | |
|---|---|---|
| ५ | सि.सि.टी.व्ही. | रु. १०,८४,८९७/- |
| ६ | एकॉस्टीक काम | रु. १,६५,३५,९९३/- |
| ७ | ध्वनीक्षेपण यंत्रणा | रु. १,३२,८१,१५६/- |
| ८ | स्टेज लायटींग | रु. १,०१,२३,१४२/- |
| | **एकुण** | रु. १२,३४,४८,२३९/- |
| | आर्किटेक्ट फी २% | रु. २४,६८,९६५/- |
| | लेबर इन्स्युरंस ०.५०% | रु. ६,१७,२४१/- |
| | कंटेनजन्सी ४% | रु. ६१,७२,४१२/- |
| | जी.एस.टी. १८% | रु. २,२२,२०,६८३/- |
| | रॉयल्टी | रु. १,१५,५९२/- |
| | **एकुण रक्कम रु.** | १५,५०,४३,१००/- |
| | **(अक्षरी रक्कम रु. पंधरा कोटी पन्नास लाख त्रेचाळीस हजार शंभर रुपये मात्र)** | |

सद्या मनपाची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने, वरिल कामी रक्कम रु. १५,५०,४३,१००/- च्या प्रस्तावास शासन हिस्सा १०० टक्केची शासन मान्यता कामी प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. सुधारीत अंदाजपत्रकानुसार वाढीव निधी मंजुर न झाल्यास मंजुर निधी रु. १० कोटी पेक्षा जादा येणारा महानगरपालिकेच्या निधीतून करावा लागणार आहे. त्याकरीता मनपा सुधारीत अर्थसंकल्प सन २०२२-२३ व सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पमध्ये तरतुद करणेत यावी.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एम.सी.ओ. २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि/१४ दि. ०६/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४२ अ(१) तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सदर कामी शहर अभियंता यांनी शिफारस केल्यानुसार विषयांकीत कामा करिता येणाऱ्या रक्कम रु. १५,५०,४३,१००/- खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका